**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ८९ मतदारसंघात प्रचाराचा आज शेवटचा दिवस
- आरक्षण आणि जाहीरनाम्याच्या मुद्द्यांवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यात आरोप-प्रत्यारोप
- पुण्यातल्या FTII च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ‘सनफ्लॉवर्स वेअर फर्स्ट टू नो’ या चित्रपटाची कान्स महोत्सवासाठी निवड

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार आज संपेल. या टप्प्यात राज्यातल्या ८ जागांसह देशातल्या एकूण ८९ जागांवर शुक्रवारी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

विद्यमान खासदार प्रतापराव जाधव, नवनीत राणा, रामदास तडस, प्रतापराव पाटील-चिखलीकर, संजय जाधव यांच्यासह प्रकाश आंबेडकर, महादेव जानकर असे अनेक महत्त्वाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात आहे.

अमरावतीमध्ये आज केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची सभा होणार आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी, प्रचार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू हे सुद्धा आज अमरावतीमध्ये त्यांच्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत. याशिवाय एकनाथ शिंदे, नितीन गडकरी, उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक महत्त्वाच्या नेत्यांच्या सभा, रोड शो या मतदारसंघात होत आहेत.

**<><><><><>**

अनुसूचित जाती आणि जमातींचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचा आरोप प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज केला. छत्तीसगडमधल्या अंबिकापूरमध्ये ते प्रचारसभेला संबोधित करत होते. संविधानात बदल करुन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीयांचे अधिकार त्यांच्या वोट बँकेला देत असल्याचा आरोप मोदी यांनी यावेळी केला. भाजपाचं आरक्षणाचा बचाव करू शकते, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

काँग्रेसच्या जाहीरनाम्यानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना विचलित केल्याची टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली आहे. पक्षाच्या सामाजिक न्याय परिषदेत ते बोलत होते. काँग्रेसच्या जाहीरनाम्यामुळं निर्माण झालेल्या अस्वस्थतेमुळे प्रधानमंत्री वारंवार पक्षाच्या जाहीरनाम्याचा उल्लेख करत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

अरुणाचल पश्चिम संसदीय मतदारसंघातल्या चार विधानसभा मतदार संघातल्या आठ मतदान केंद्रांवर आज कडक सुरक्षा व्यवस्थेत पुनर्मतदान होत आहे. आज सकाळी सहा वाजता मतदानाला सुरुवात झाली असून दुपारी दोन वाजेपर्यंत मतदान सुरु राहणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या ११ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ९६ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात **औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर** आणि शिर्डी या मतदारसंघांचा या टप्प्यात समावेश आहे.

अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस असल्यानं अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची लगबग सुरू आहे. जालन्यातून महाविकास आघाडीचे उमेदवार कल्याण काळे यांनी आज अर्ज भरला. त्यावेळी राजेश टोपे, अमित देशमुख यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक नेते उपस्थित होते. बीडमधून पंकजा मुंडे, औरंगाबादमधून विद्यमान खासदार आणि एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलिल, शिर्डीमधून वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रुपवते आज उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

या मतदारसंघात २६ एप्रिल रोजी अर्जाची छाननी होणार असून उमेदवारांना २९ एप्रिल पर्यंत अर्ज मागे घेता येईल.

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्राच्या वीवीपॅट पावत्यांची संपूर्ण पडताळणी करण्यासंबधातील याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाकडून माहिती मागवली आहे. मतदान यंत्रं आणि पावत्या यांच्यासंदर्भातल्या तांत्रिक माहितीबरोबरच याचिका दाखल करण्यासाठी मतदानानंतर उमेदवाराला असलेला कालावधी, लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गतचा कालावधी आणि माहितीची सुरक्षितता राखण्याचा कालावधी यातील फरकाबाबतही माहिती न्यायालयाने मागवली आहे. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याने आज दुपारी दोन वाजेपर्यंत ही माहिती देण्यासाठी न्यायालयात हजर रहावं असं न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालील पीठानं सांगितलं आहे. सर्वोच्च न्यायालय त्यानंतर या संदर्भात मार्गदर्शक सूचना देईल.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण सांगली लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

नवीन पायाभूत सुविधा प्रकल्प आणि आपत्तीनंतरची पुनर्बांधणी करण्यासाठी लवचिकता आवश्यक असून अशा लवचिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणं

महत्वाचं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांवर आधारित सहाव्या आंतरराष्ट्रीय परिषदेला ते आज दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करत होते. नवी दिल्ली इथं दोन दिवस ही परिषद होत आहे. कोणत्याही आपत्तींचं मोजमाप आर्थिक बाबीनुसार केलं जात असलं तरीही आपत्तींमुळे खऱ्या अर्थानं नागरिकांचं, कुटुंबांचं आणि समुदायांचं नुकसान होत असतं, असं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

दिल्लीतल्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून काल सुमारे पंधरा विमानांची उड्डाणं वळवण्यात आली आहेत. काल संध्याकाळी दिल्लीच्या अनेक भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. यापैकी नऊ उड्डाणं जयपूरला, प्रत्येकी दोन अमृतसर आणि लखनौला आणि प्रत्येकी एक मुंबई आणि चंदीगडला वळवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

दाऊदी बोहरा समाजाचे नेते म्हणजेच सय्यदना पदावर, मुफद्दल सैफुद्दिन यांचा हक्क असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने काल दिला. सैय्यदना म्हणून त्यांच्या हक्काला आव्हान देणारी याचिका गेली नऊ वर्षं सुरु होती.

**<><><><><>**

वजनानं हलक्या असलेल्या बुलेट प्रूफ जॅकेटची निर्मिती संरक्षण संशोधन आणि विकास संस्था-डीआरडीओनं केली आहे. या जॅकेटमुळे BIS दारुगोळ्याच्या

सहाव्या श्रेणीतील स्फोटातून संरक्षण केलं जातं. अलिकडेच या जॅकेटची यशस्वी चाचणी चंढीगढच्या टीबीआरएल प्रयोगशाळेत झाली.

**<><><><><>**

पुण्याच्या FTII च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्रपटाची, ‘७७ व्या कान्स फिल्म फेस्टिवल’ मध्ये निवड झाली आहे. यंदाच्या १५ ते २४ मे दरम्यान हा महोत्सव फ्रान्समध्ये होत असून ‘ला सिनेफ’ या विभागात ‘सनफ्लॉवर्स वेअर फर्स्ट टू नो’ या FTII च्या विद्यार्थ्यांनी निर्मित केलेल्या चित्रपटाची निवड झाली आहे. FTII सारख्या जगभरातल्या चित्रपटासंदर्भात प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या विद्यार्थांना प्रोत्साहन देण्यासाठी कान्स फेस्टिवलचा ‘ला सिनेफ’ हा विभाग कार्यरत आहे. ‘सनफ्लॉवर्स वेअर फर्स्ट टू नो’ या चित्रपटाचं दिग्दर्शन चिदानंद नाईक या विद्यार्थ्यानं केलं असून ध्वनिमुद्रण अभिषेक कदम या विद्यार्थ्यानं केलं आहे.

**<><><><><>**

उष्णतेची लाट आणि त्यामुळे वाढलेल्या तापमानामुळे त्रिपुरा राज्य सरकारनं पुढील चार दिवस सर्व शाळांना सुटी देण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यातील सर्व सरकारी तसंच खासगी शाळा २४ ते २७ एप्रिल या कालावधीत बंद राहतील.

**<><><><><>**

अमेरिकेच्या संसदेनं टिकटॉक या ॲपवर बंदी घालणाऱ्या विधेयकाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत या ॲपवर अमेरिकेत बंदी येण्याची शक्यता

आहे. या ॲपवर बंदी घालण्याच्या दृष्टीनं आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यावर राष्ट्राध्यक्ष जो बायडेन ठाम आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सनं चेन्नई सुपर किंग्जचा ६ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना चेन्नईनं २० षटकांत ४ गडी बाद २१० धावा केल्या. तर लखनौनं १९ षटक ३ चेंडूंत ४ गडी बाद २१३ धावा करून विजय मिळवला.

**<><><><><>**

जागतिक ॲथलेटिक्स रिले २०२४ स्पर्धेसाठी १५ जणांचा समावेश असलेल्या भारतीय रिले संघाची घोषणा करण्यात आली. पॅरिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकसाठीची पात्रता फेरी, ४ आणि ५ मे रोजी बहामास या देशाची राजधानी असलेल्या नासाऊ इथं होणार आहे. भारतीय ॲथलेटिक्स संघ ४ बाय ४०० मीटर स्पर्धेतील पुरुष गट,४ बाय ४०० मीटरमधील महिला गट आणि संमिश्र गटात सहभागी होणार आहे.